## G + 1 घर विकणे आहे

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

**ठिकाण** : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

**अपेक्षित किंमत : ७८ लाख + टॅक्स**

**संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

## लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय

फक्त ५१०००/- रु.

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट

मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १४४ वा | मंगळवार, दि. ०७ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## हुरडा पार्टी

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

## वाडा भाड्याने देणे आहे

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591

# तपासावर परिणाम होऊ नये म्हणून धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या

## सर्वपक्षीय नेत्यांची राज्यपालांकडे मागणी

## संतोष देशमुख प्रकरणी बोलणाऱ्या नेत्यांच्या जीवाला धोका, फडणवीसांनी गांभीर्य ओळखावं - शरद पवार



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची आज छत्रपती संभाजी राजे यांच्यासह अंबादास दानवे, विजय वडेट्टीवार, ज्योती मेटे, सुरेश धस, बीडचे खासदार आमदारांनी भेट घेतली. याबाबत आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सर्वांची मागणी एकच होती, की, संतोष देशमुख हत्याप्रकरणातील तपासावर परिणाम होऊ नये म्हणून धनंजय मुंडे यांनी राजीनामा घ्यावा असे धस म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही भेटत राजीनाम्याची मागणी करणार असल्याचे धस म्हणाले. त्यांच्याकडे गृह खाते आहे.

आम्ही छोट्या माणसांनी त्यांना सांगायची गरज नाही, आमची लायकी नाही असेही ते म्हणाले.

**अजित दादांवर माझा हक्क**

संभाजीराजे यांनी सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे धस म्हणाले. स्वपक्षाची कुठेही नाराजी नाही. मी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबतही बोलणार आहे. मी मात्र संतोष देशमुखबद्दल बोलणं थांबवणार नाही असेही धस म्हणाले. अजितदादांवर काय टीका केली, त्यांना लागायचं काय कारण आहे असेही धस म्हणाले. माझ्याकडून अनवधानाने एक शब्द अरे तुरे केला तो शब्द परत घेतलाय. अजित दादांवर माझा हक्क आहे अरे तुरे बोलण्याचा असेही धस म्हणाले. अजित पवार यांच्यासोबत मी फार काळ काम केले आहे. अधिकार वाणीने मी त्यांचा एकेरी उल्लेख केला होता असे सुरेश धस म्हणाले. एक नैतिक जबाबदारी म्हणून अरे तुरेची भाषा करायला नको होती, मी दिलगिरी व्यक्त करतो असेही सुरेश धस म्हणाले.

**वंजारी समाजाच्या 90 टक्के लोकांना हे पटलेले नाही**

वंजारी समाजाच्या 90 टक्के लोकांना हे पटलेले नाही. गँग्ज ऑफ वासेपूर यांचाही त्रास मुकादमांना झाला आहे. त्यामुळे वंजारी समाजाचे मुकादम त्रासलेले आहेत असे धस म्हणाले. माझे दोन्ही मोबाईल तुमच्याकडे आहेत

त्यांच्या सोबत माझे संभाषण झालेले नाहीत असे धस म्हणाले. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितल्यानंतर मी पुढे जाणारा कार्यकर्ता नाही असेही धस म्हणाले. मी या प्रकरणावर हृदयापासून बोलत आहे. इतर कुठल्याही विषयावर मी बोलत नाही. उद्या बावनकुळे यांचीही भेट घेणार असल्याचे धस म्हणाले.

**नितीन बिकड हा सहआरोपी होऊ शकतो**

माझी माध्यमांना विनंती आहे की कदाचित नितीन बिकड हा सहआरोपी होऊ शकतो. आरोपी त्याने सांभाळले आहेत असेही सुरेश धस म्हणाले. आज किंवा उद्या हा बिकड आत जाऊ शकतो.

ज्यांचा रेकॉर्ड आहे, त्यांनी मला शिकवण्याची गरज नाही असे धस म्हणाले. माझ्यासोबत फोटो असेल तर प्रसिद्ध करा. याचा अर्थ आम्ही तेवढे जवळ नाहीत, जेवढ्या जवळ हे धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांच्या जवळ आहेत असेही धस म्हणाले. मी सांगितल्या तारखेला हे तिथे दिसतील. 19 जून 2024 मध्ये सातपुडा बंगल्यावर बैठक झाली होती. त्या बैठकीत हा नितीन बिकड होता. ओम साई राम कंपनी कुणाकडे आहे, ते तपासा असेही धस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणाविरोधात आवाज उठवणाऱ्या नेत्यांना येणाऱ्या धमक्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर लोकप्रतिनिधी आणि इतर नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घ्यावा आणि त्यांना राज्य सरकारमार्फत योग्य ते पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

**शरद पवार काय म्हणाले ?**

राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्राची कॉपी 'एक्स' सोशल मीडियावर शेअर करत भूमिका मांडली. "बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची महिनाभरापूर्वी काही गुंडांनी निर्घृण हत्या केली. या क्रूर घटनेला भला मोठा काळ उलटून गेला असला तरी देशमुख यांचे मारेकरी अद्याप मोकाटच असल्याची जनभावना आहे. त्यामुळे, या संपूर्ण घटनेला फार मोठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे निदर्शनास येते."

"बीड- परळी भागात यापूर्वी देखील माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे या गुंड प्रवृत्तीची पाळेमूळे खणून काढण्याची राज्यभरातील अनेक लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे व त्यासाठी ते सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा करत आहेत." असे पुढे शरद पवारांनी म्हटले आहे.

# पाणलोट यात्रा अंतर्गत गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण करावी -जिल्हाधिकारी आशीर्वाद

## पाणलोट विकास घटक 2.0 योजना सोलापूर जिल्ह्यातील माढा, कुर्डुवाडी, मंगळवेढा व सांगोला या तालुक्यात राबविली जाणार



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाने माहे जानेवारी 2025 पासून राज्यातील 30 जिल्ह्यात पाणलोट गावातील पाणलोट यात्रा सुरू केलेली आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील माढा, कुर्डुवाडी, मंगळवेढा व सांगोला या चार तालुक्यात त उपक्रम राबवण्यात येणार आहे तरी जलसंधारण विभागाच्या सर्व संबंधित यंत्रणांनी उपरोक्त तालुक्यातील प्रत्येक गावात पाणलोट चळवळ निर्माण करण्यासाठी प्रबोधन मोहीम राबवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

या यात्रेचे नियोजन करण्याकरिता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अध्यक्षतेत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली. यावेळी सदस्य सचिव तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमोल जाधव, जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद एस. (पान 2 वर..)

# सोलापूर-पुणे महामार्गावर मोहोळ येथे मालट्रकला लागली आग

## दोन दिवसातील सलग दुसरी घटना



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** चालत्या मालट्रकच्या बॅटरी मध्ये शॉर्टसर्किट होऊन लागलेल्या आगीत मालट्रक जळून खाक झाली. ही घटना सोमवारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्गावरील शेटफळ ता मोहोळ शिवारात डोंगरे वस्ती जवळ घडली.

यात कुठलीही जीवित हानी झाली नाही. या घटनेची नोंद मोहोळ पोलिसात झाली आहे. दरम्यान रविवार ता 5 रोजी मोहोळ बस स्थानकात एका एसटी बस ने पेट घेतला होता तर सलग दुसऱ्याच दिवशी सोमवारी एका मालट्रक ने पेट घेतल्याची घटना घडली आहे.

या संदर्भात मोहोळ पोलिसा कडून मिळालेल्या माहिती नुसार, मालट्रक क्रमांक एमएच 12/ एलटी 46 16 ही न्हावाशेवा (मुंबई) येथून प्लॅस्टिकचे दाणे घेऊन हैदराबाद कडे निघाली होती. दरम्यान मालट्रक शेटफळ शिवारात येतात बॅटरीमध्ये शॉर्टसर्किट होऊन धूर येत असल्याचे चालकाला जाणवले. त्याने तातडीने हालचाल करून मालट्रक रस्त्याच्या बाजूला घेतली, त्यावेळी संपूर्ण गाडीने खालून पेट घेतल्याचे त्याच्या निदर्शनास आले. दरम्यान जमा झालेल्या नागरिकांनी आग विझविण्याचा मोठा प्रयत्न केला, तर कुडूर्वाडी नगरपालिकेच्या अग्निशामक गाडीने ही आग विझविण्याचा मोठा प्रयत्न केला.

किमान सात टँकर पाणी संपले तरीही आग धुमसत होती. कारण मालट्रक मध्ये प्लॅस्टिक वस्तू असल्याने मारलेले पाणी निसरून जात होते. दरम्यान गस्ती पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी साळुंखे यांना ही घटना समजताच त्यांनी पोलीस हवालदार गणेश हंचे, पोलीस कॉन्स्टेबल विष्णू रुपनवर यांना पाचारण केले. तसेच मोडनिंब येथील राष्ट्रीय महामार्ग विभागाचे संतोष खडके, बंडू गायकवाड, स्वप्निल शिंदे यांनीही आग विजवण्यासाठी मोठे प्रयत्न केले.

दरम्यान डोंगरे वस्ती जवळच असणारे सागर सुरवसे यांच्या शेतातील विहिरीतून पाणी आणून विश्वास वाघमारे, संभाजी चव्हाण या शेतकऱ्यांनी पाईप टाकून आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला.त्यामुळे आग आटोक्यात आली. या घटनेची नोंद मोहोळ पोलिसात झाली असून अधिक तपास अंमलदार चंद्रकांत आदलिंगे करीत आहेत.

# 154 शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचा प्रश्न लागला मार्गी

## आ. राजू खरे यांच्या पाठपुराव्याला यश



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जानेवारी 2023 मध्ये उजनीचा डावा कालवा फुटून परिसरातील शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पैसे त्वरित त्यांना द्यावेत अशी मागणी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत केल्याने, येत्या आठ दिवसात नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना पैसे मिळतील अशी ग्वाही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

त्यामुळे आमदार राजू खरे यांच्या या मागणी मुळे आज तरी 154 शेतकऱ्यांचा नुकसान भरपाई चा प्रश्न मार्गी लागला आहे.

तारीख 29 जानेवारी 2023 रोजी पहाटे सहा वाजता पाटकुल ता मोहोळ हद्दीत साखळी क्रमांक 112/ 650 या ठिकाणी उजनीचा डावा कालवा अचानक फुटला. कालवा फुटल्याने शेतकऱ्यांचे कोट्यावधीचे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या. अनेकांच्या विहिरी, बोअर गाळाने भरली, ठिबक सिंचन इलेक्ट्रिक मोटारी वाहून गेल्या, तर एका शेतकऱ्याचे घर पडले. एका अर्ध्या तासाच्या कालावधीत होत्याचे नव्हते झाले.

कॅनॉल फुटल्याने द्राक्ष, डाळिंब आदीसह अन्य फळबागा व पिकेही वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थीक नुकसान झाले. दरम्यान महसूल प्रशासनाने तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी तातडीने पंचनामे करून तहसीलदार यांना अहवाल सादर केला. तहसीलदारानी तो अहवाल जलसंपदा विभागाकडे पाठविला.

घटना घडल्या नंतर अनेक आमदार, खासदार, विविध वरिष्ठ शासकीय अधिकारी, कारखान्यांचे अध्यक्ष यांनी भेटी देऊन तोंड भरून लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळवून देऊ म्हणून आश्वासने दिली, फोटोसेशन झाले. मात्र पुन्हा ना फिरकले ना पाठपुरावा त्यामुळे दोन वर्ष हा प्रश्न शेतकऱ्यांचा रखडला होता.

दरम्यान आमदार राजू खरे यांनी शुक्रवारी झालेल्या जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई बाबत आवाज उठविला, त्यामुळे जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी येत्या आठ दिवसात पैसे देण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे शेतकऱ्यांचे आता आठ दिवसांकडे डोळे लागले आहेत.

# राज्यात यंदाही ज्वारी पिकात सोलापूर जिल्ह्याचा दबदबा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ज्वारीपेरणीत यंदाही राज्यात सोलापूर जिल्हा अव्वल असून, राज्यातील एकूण पेरणीपैकी एकट्या पश्चिम महाराष्ट्रातच ५० टक्क्यांपर्यंत पेरा झाला आहे.

ज्वारी पेरणीत सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्राचा दबदबा असला, तरी गहू व हरभऱ्याने मराठवाड्यातील क्षेत्र अधिक व्यापले आहे.

राज्यात रब्बी पेरणी कालावधी जवळपास पूर्ण होत आला आहे.

उशिराने गहू व हरभऱ्याच्या पेरणीने चांगला वेग घेतल्याचे कृषी खात्याकडील आकडेवारीवरून दिसत आहे. राज्यात यंदा ज्वारी पेरणीचे सरासरी क्षेत्र १७ लाख ५३ हजार हेक्टर इतके होईल, असा कृषी खात्याचा अंदाज होता.

त्यादृष्टीने रब्बी पेरणीसाठीचे नियोजन करून त्या-त्या जिल्ह्यांना उद्दिष्ट देण्यात आले होते. सोलापूर जिल्ह्यात उद्दिष्टपेक्षा कमी क्षेत्रावर ज्वारीची पेरणी झाली असली, तरी राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वाधिक पेरणी झाली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात ज्वारी पेरणी फारच कमी क्षेत्रावर झाली असली, तरी अहिल्यानगरसह पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक क्षेत्र ज्वारीने व्यापले आहे. राज्यात ज्वारीचे सरासरी १४ लाख ५३ हजार हेक्टर क्षेत्र असले, तरी प्रत्यक्षात १५ लाख लाख हेक्टरपर्यंत पेरणी झाली आहे.

त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यात अडीच लाख हेक्टरपर्यंत, तर अहिल्यानगरसह पश्चिम महाराष्ट्रात ७ लाख ४० हजार हेक्टरवर ज्वारीचा पेरा झाला आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत ६ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची पेरणी झाली आहे.

**गहू पेरणीत छत्रपती संभाजीनगरनंतर नागपूर**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गव्हाची सर्वाधिक एक लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली, तर नागपूर जिल्ह्यात ८९ हजार हेक्टर, बुलढाण्यात ६६ हजार, नाशिक जिल्ह्यात ६१ हजार, जालना जिल्ह्यात ६० हजार, पुणे व जळगावमध्ये प्रत्येकी ५५ हजार हेक्टर क्षेत्रावर गहू पेरणी झाला आहे.

सोलापूर जिल्ह्यात ५० हजार हेक्टर, बीड जिल्ह्यात ४५ हजार, तर सातारा जिल्ह्यात ४० हजार हेक्टर क्षेत्रावर गव्हाचा पेरा झाला आहे. अहिल्यानगरसह पश्चिम महाराष्ट्रात दोन लाख ८७ हजार, तर मराठवाड्यात तीन लाख ४४ हजार हेक्टर क्षेत्रावर गहू पेरणी झाला आहे.

गव्हाचे राज्यात सरासरी क्षेत्र १० लाख ४९ हजार हेक्टर क्षेत्र असताना, प्रत्यक्षात ११ लाख ८० हजार (११२ टक्के), मका दोन लाख ५८ हजार हेक्टर सरासरी क्षेत्र आहे.

प्रत्यक्षात ४ लाख ४४ हजार हेक्टर (१७२ टक्के), हरभरा २१ लाख ५२ हजार हेक्टर सरासरी क्षेत्र असले, तरी प्रत्यक्षात २७ लाख २९ हजार हेक्टर क्षेत्रावर (१२७ टक्के) पेरणी झाली आहे. यात आता अंतिम पेरणी काही हेक्टर वाढ होईल, असे कृषी खात्याकडून सांगण्यात आले.

# उजनीतून शेतीसाठी पाणी सोडले

## काटकसरीने पाणी वापरण्याचे केले आवाहन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जलसंपदा विभाग मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) अध्यक्षतेखाली झालेल्या उजनी प्रकल्प कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार उजनी धरणाच्या डाव्या मुख्य कालव्या मधून रब्बी आवर्तन क्र.१ साठी सकाळी ९ वाजता सुरुवातीला ५०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात आले.

दरम्यान, आवश्कते नुसार विसर्गामधे वाढ करण्यात येणार आहे असल्याचे उजनी धरण लाभक्षेत्र प्रधिकरण विभागाने सांगितले. उजनी प्रकल्पाच्या पाण्याचे सर्व लोकप्रतिनिधी अधिकारी व शेतकरी, नागरिक यांच्या सहकायार्तून अत्यंत सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत जलसंपदा विभागामार्फत ४ जानेवारी, १ मार्च व १ एप्रिल अशा एकूण ३ पाळ्या पाणी सिंचनासाठी देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. परंतु ४ जानेवारी २०२५ रोजी सिंचनासाठी पहिले आवर्तन उजनी धरणातून सोडल्यानंतर माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये उजनी प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीची पुन्हा बैठक घेऊन उपलब्ध पाण्यातून जास्तीत जास्त पाणी देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच प्रत्येक आवर्तनामधून शेतकरी व नागरिकांनी पाण्याची बचत करावी, असेही आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे. उजनी प्रकल्पात ४ जानेवारी २०२५ रोजी उपयुक्त पाणीसाठा ५१.९२ टीएमसी (टक्केवारी ९६.९२), अचल पाणीसाठा ६३.६६ टी एम सी तर एकूण पाणीसाठा ११५.५८ टीएमसी असल्याचे सांगितले.

# HMVP हा नवीन विषाणू नाही, घाबरुन जाऊ नका

## केंद्रीय आरोग्य मंत्र्याचे नागरिकांना आवाहन



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** कोरोना महामारीनंतर पुन्हा एकदा चीनमधून एक नवीन व्हायरसबद्दल बातम्या समोर येत आहेत. यानंतर जगभरातील नागरिकांमध्ये चिंतेचा लाट पाहायला मिळत आहे. चीनमध्ये HMPV नावाच्या एका नव्या विषाणूचा फैलाव होऊ लागला असून मोठ्या प्रमाणावर या विषाणूची लागण चीनमध्ये नागरिकांना झाल्याचं सांगितलं जात आहे. भारतात देखील याचे आतापर्यंत तीन रुग्ण आढळून आले आहेत. यादरम्यान देशाचे आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी एका व्हिडीओ संदेशात लोकांना घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे म्हटले आहे.

एचएमपीव्ही विषाणू हा काही नवीन विषाणू नाही आणि याला घाबरून जाण्याची काही आवश्यकता नाही असे नड्डा आपल्या निवेदनात म्हणाले आहेत. तसेच सरकार सध्या परिस्थितीवर लक्ष्य ठेवून असल्याची प्रतिक्रिया देखील केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी दिली आहे.

जेपी नड्डा म्हणाले की, आरोग्य विषयक तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे की एचएमपीव्ही हा काही नवीन विषाणू नाही. हा २००१ मध्ये आढळून आला होता आणि अनेक वर्षांपासून जगभर पसरत आहे. एचएमपीव्ही हा विषाणू श्वास घेताना हवेचे माध्यमातून हा विषाणू पसरतो आणि हा सर्व वयाच्या नागरिकांना होऊ शकतो. हा विषाणू हिवाळ्याच्या दिवसात जास्त प्रमाणात पसरतो.

पुढे बोलताना आरोग्य मंत्री नड्डा म्हणाले की, चीनमध्ये एचएमपीव्हीचे रुग्णांबद्दल रिपोर्ट समोर आल्यानंतर आरोग्य मंत्रालय, आयसीएमआर (पान 2 वर..)

# संघटनात्मक निवडणुकांसाठी जास्त सदस्य नोंदणी करून पक्ष संघटना अधिक सक्षम करा




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यात आगामी काळात देखील संघटनात्मक निवडणुकांसाठी सर्वांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून पक्ष संघटना अधिक सक्षम करावी, असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी कार्यकर्त्यांना केले. भाजपच्या सदस्यता नोंदणी अभियानासंदर्भात येथे कार्यशाळा पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सध्या देशात सर्वत्र अत्यंत सक्रियतेने हे अभियान सुरू आहे. त्याच अनुषंगाने या अभियानाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी सर्व कार्यकत्यांनी सदस्यता अभियानात सक्रिय सहभाग घेऊन संघटना मजबूत करण्यासाठी बूथनिहाय नियोजन करावे, खास करून महिला कार्यकर्त्यांनी आपल्या लाडक्या बहिणींची जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन केले. यावेळी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार यांनीही मार्गदर्शन केले. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता आहे. तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन यांच्यासह माजी नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी, परमेश्वर यादवाड, प्रभाकर मजगे, यशवंत धोंगडे, फैज अहमद कोरबू, महेश हिंडोळे, विलास गव्हाणे, आनंद तानवडे, राजेंद्र बंदीछोडे, कय्युम पिरजादे, जयशेखर पाटील, अरविंद ममनाबाद, अंकुश चौगुले, रामचंद्र अरवत, सुरेश गड्डी, केदार विभूते, महादेव पाटील, सुनील कळके आदी उपस्थित होते.

# आई-वडिलांमुळे माझ्या लिखाणात संवेदनशीलता आली : गायकवाड



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** प्रिसिजन वाचन अभियान अंतर्गत लेखक समीर गायकवाड यांच्या 'गौहर आणि गवाक्ष'या पुस्तकाचे डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते प्रकाशन झाले. पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर लेखक समीर गायकवाड यांची माधव देशपांडे यांनी प्रकट मुलाखत घेतली. प्रारंभी संदीप जाधव आणि आर. जे. अमृत ढगे यांनी या पुस्तकांचे अभिवाचन केले. यावेळी फाऊंडेशनच्या संचलिका स्नेहा सावे व सविता समीर गायकवाड या उपस्थित होत्या. समीर गायकवाड याप्रसंगी बोलताना म्हणाले,माझ्या आईला झालेल्या त्रासातून, तिने केलेल्या संघषार्तून माझ्या लिखाणात संवेदनशीलता आली.सोलापूरमधील तरटी नाका परिसरात मेडिकल चालवत असताना ओळख झालेल्या एका मुलीच्या शोधातून ह्या लिखाणाचा प्रवास सुरू झाला. वेश्याव्यवसाय या विषयात खुलेपणाने कोणी बोलत नाही, पण त्याबद्दल लिहिणं हे खूप जिकिरीचं होतं.

लिखाणाच्या निमित्ताने रेडलाईट भागात फिरत असताना अशा अनेक घटना होत्या, की ज्याबद्दल पोलिसांना सांगितल्यावर पोलिसांनी खूपवेळी मदत करून मुलींना वाचविण्यात यश आले आहे. दिल्ली, महाराष्ट्र, कर्नाटक अशा ठिकाणी पोलिसांना माहिती देऊन अनेक मुलींना या सर्व व्यवसायातून बाहेर काढण्यात मदत झाली. पुस्तक लिहिण्याची प्रेरणा ही वेगवेगळ्या वाचनातून आली आहे.

चारपैकी आम्ही तीन भावंडं लेखक आहोत,त्याच्या मागची प्रेरणा ही पुस्तक वाचन आहे.झांबळ आणि गौहर या पुस्तकामुळे सामान्य माणसाला अनभिन्न असणाऱ्या विषयाचं वाचन करून अनुभवता आलं. या मुलाखती दरम्यान लेखकांचे संवाद ऐकताना अनेक रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झालेल्या दिसल्या. माझा वाचन प्रवास या उपक्रमांतर्गत प्रा. डॉ. प्रदीप जगताप यांनी त्यांचा वाचन प्रवास मांडला.

# 'सिध्दोत्सव २०२५' मध्ये टेक्निकल व स्पोर्टस इव्हेंटमध्ये विविध स्पर्धा आयोजित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री सिध्देश्वर देवस्थान संचलित श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये 'सिध्दोत्सव २०२५' चे उद्घाटन प्रमुख पाहण्या वैशाली अघोर व योगेश इंडी यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने करण्यात आले.तसेच वाचन संकल्प महाराष्ट्र ही संकल्पना १ ते १५ जानेवारीदरम्यान राबवण्यात येणार आहे. विद्यार्थिनीच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी पूर्ण आठवडा सिध्दोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यावेळी आपल्या प्रेरणादायक भाषणात, अघोर म्हणाल्या,पुस्तक वाचन फक्त एक व्यक्तिगत आनंद किंवा छंद नसून त्यातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या व व्यक्तिगत भल्यासाठी करणे अत्यंत आवश्यक आहे.प्राचार्य गजानन धरणे यांनी स्वागत करून सर्व विद्यार्थिनींना जास्तीत जास्त सहभागी होण्याचे आवाहन केले. शिक्षणाच्या युगात ज्ञान प्राप्ती केवळ व्यक्तिगत उद्देशांसाठी न करता, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोगी व्हावी, असेही त्यांनी सांगितले.

स्पोर्टस मैदान उद्घाटनप्रसंगी इंडी यांनी खेळाचे महत्त्व सांगून सर्व विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. 'सिध्दोत्सव २०२५' मध्ये टेक्निकल व स्पोर्टस इव्हेंटमध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत, असे सांस्कृतिक विभागप्रमुख सुचिता चौधरी यांनी प्रास्तविकात सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृती झंवर व भाग्यलक्ष्मी सुतार या विद्यार्थिनींनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत. यावेळी डॉ. नीता आळंगे,डॉ. अविनाश पाटील, प्रमोद शिवगुंडे, नवनाथ माने, प्रतिभा पाटील, अतुल कंदले, श्रीशैल माळेवडी, कोमल चिट्टे, अमृता दौलताबाद व ग्रंथपाल रेणुका इरशेट्टी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग नवी दिल्लीचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांची भेट



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग नवी दिल्लीचे सदस्य पी. पी. वावा यांनी पंढरपूर नगर परिषदेला भेट दिली. सफाई कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न आणि अडचणीवर चर्चा केली. पंढरपूर येथील विश्रामधाम येथे पंढरपूर नगरपरिषदमधील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध अडचणींबाबत मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव,उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळूजकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, नगर अभियंता नेताजी पवार यांच्यासमवेत पी. पी. वावा यांनी बैठक आयोजित केली होती.तसेच यावेळी १३ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्तीचे आदेश देण्या आले.यावेळी सफाई कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी घरे बांधून देणे, लाड पागे शिफारशीनुसार नेमणुका करणे, सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक उन्नतीकरिता त्यांच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचे बचत गट निर्माण करून त्यांनाही व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करून देणे, सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना शैक्षणिक पात्रतेनुसार काम देणे, सफाई कर्मचारी आरोग्य शिबिर घेणे, सफाई कर्मचाऱ्यांचे मेडिक्लेम विमा उतरविणे, गुजराती कॉलनी येथील सफाई कर्मचाऱ्यांच्या घरांची दुरुस्ती करणे त्याठिकाणी लायब्ररी निर्माण करणे, ओपन जीम तयार करणे व इतर सेवा सुविधा कर्मचाऱ्यांना देणे, महिला कर्मचाऱ्यांसाठी चेंजींग रूम तयार करणे यावर चर्चा करण्यात आली यावेळी गिरी नाथ, संदीप चरण, उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळूजकर, नगर अभियंता नेताजी पवार, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, हाके, ऋषी अधटराव, चिदानंद सर्वगोड, चेतन चव्हाण, गुरू दोडिया, महादेव आदापुरे, नानासाहेब वाघमारे, धनाजी वाघमारे, संतोष सर्वगोड, दत्तात्रय चंदनशिवे, दिनेश साठे, जयंत पवार, अनिल गोयल, सतीश सोलंकी आदी उपस्थित होते.

# गुरुवारी 9 जानेवारी रोजी ग्रामपंचायतीत काम बंद आंदोलन




**पुणे (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने स्व. संतोष देशमुख यांना राज्यातील प्रत्येक गावात ग्रामपंचायतीमध्ये संघटनेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील व राज्य सरचिटणीस विवेक ठाकरे,वरिष्ठ उपाध्यक्ष शशिकांत मोरे यांनी शासनाला कळवत जाहीर श्रद्धांजली वाहण्यात येऊन येत्या गुरुवारी 9 जानेवारी रोजी केले आहे. संघटनेने आहे. संघटनेने राज्याचे एक दिवसीय काम आंदोलन बंद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,करण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व अजितदादा पवार आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना इमेलद्वारा याबाबत मागणी निवेदन देऊन कळवले आहे की, राज्यातील सर्वच ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भावना अत्यंत तीव्र असून लोकप्रतिनिधी म्हणून आणि ग्रामीण महाराष्ट्रातील गाव खेड्यातील सामाजिक वातावरण चांगले राहण्यासाठी सरपंच व सर्वच गावकारभारी असणाऱ्या सहकाऱ्यांना संरक्षण असणं अत्यंत गरजेचे आहे. सरपंच हा पब्लिक सर्हन्ट असल्याबाबत तेलंगणा सुद्धा व राजस्थान उच्च न्यायालयासह सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे त्यानुसार सरपंचाच्या फिर्यादीवरून शासकीय कामात अडथळा आणला म्हणून पूर्वीचे भादवी 353 आताचे भारत न्यायसंहिता 132 प्रमाणे गुन्हा नोंद व्हावा, तरच गावच्या विकासकामात आणणाऱ्यावर जरब अडथळा बसेल. गावच्या हितासाठी समाजसेवेमध्ये भाग घेणाऱ्या सरपंचांना व त्यांना मदत करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण अत्यावश्यक आहे. अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानवीय हत्येनंतर महाराष्ट्रातील समाजमन हेलावले आहे. या महाभयानक हत्येमुळे राज्यातील सरपंच उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य भयभीत झालेले आहेत. अनेक गावात ग्रामपंचायत कारभार करताना गावकारभारी दबावाखाली असतात. सरपंच व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाने कायदा करून ठोस उपाययोजना कराव्यात म्हणून राज्यातील ग्रामपंचायती एक दिवसीय काम बंद आंदोलन करणार आहेत, असे पंचायत राज मंच संचालित अखिल भारतीय सरपंच परिषदेने जाहीर केले आहे.

**सरपंच परिषदेने शासनाकडे केलेल्या यासंबंधी मागण्या अशा**

1. सरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी संरक्षण कायदा असावा.
2. प्रत्येक ग्रामसभेला पोलीस संरक्षण कंपल्सरी करण्यात यावे.
3. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीच व्हावी.
4. स्वर्गीय संतोष देशमुख कुटुंबियातील एकाला शासकीय नोकरी द्यावी.
5. स्व. संतोष देशमुख यांचे स्मारक त्यांच्या गावात उभे करावे.
6. सरपंचांना विमा संरक्षण व पेन्शन लागू व्हावे.
7. ग्रामसभा सर्व ग्रामस्थांसाठी असल्याने ग्रामपंचायतीच्या मासिक मीटिंगमध्ये इतरांना कायद्याने प्रतिबंध असावा.

**राज्य पदाधिकाऱ्यांचे आवाहन:** शासनाचे या प्रमुख मागण्याकडे लक्ष वेधण्यासाठी येत्या 9 जानेवारी (गुरुवारी) एक दिवसीय कामबंद आंदोलनात राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन सरपंच परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. पूर्व विदर्भ विभाग प्रमुख प्रमोद गमे (नागपूर) राज्य कार्यकारणी सदस्य संजय कांबळे (कोल्हापूर) अमरावती विभाग प्रमुख दादा लवकर (बुलढाणा) कोकण विभाग प्रमुख अतुल लांजेकर (रत्नागिरी) मराठवाडा विभाग प्रमुख दासराव हंबर्डे (नांदेड) पश्चिम महाराष्ट्र प्रमूख प्रदीप माने (सांगली) उत्तर महाराष्ट्र प्रमुख वासुदेव नरवाडे (जळगाव) आदिवासी विभाग प्रमुख राहुल गावित (नंदुरबार) यांच्यासह रावेर लोकसभा विभाग अध्यक्ष रुपेश गांधी व जळगाव लोकसभा विभाग अध्यक्ष सचिन पवार यांनी हे आवाहन केले आहे.

# विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी एक लाख रुपये आर्थिक मदत करणार- राजेंद्र गिरमे



**माळीनगर (कटूसत्य वृत्त):-** महात्मा फुले पतसंस्थेच्या वतीने दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीमध्ये शिक्षण घेणामाझ्याया गरजू व गुणवत्तेच्याआधारे अशा १० विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना"अंतर्गत, दरवर्षी एक लाख रुपयांची आर्थिक मदत करणार असल्याचे म.फुले पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून माळीनगर येथे जाहीर केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती माळीनगर येथील दि मॉडेल विविधांगी प्रशालेत विविध उपक्रमाने व बक्षिस वितरण समारंभाने साजरी करण्यात आली. प्रारंभी क्रांतिसूर्य म.फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन संचालिका ज्योतिताई लांडगे व सौ.नेवसेताई यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राजेंद्र गिरमे, व्हा. चेअरमन नितीन इनामके, सेक्रेटरी अजय गिरमे, खजिनदार ज्योतिताई लांडगे, विजय नेवसे, जयवंत चौरे, मिलिंद गिरमे, प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक कल्याण कापरे,स्पर्धा प्रमुख सुनील शिंदे तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी स्पर्धेमध्ये बक्षीसे मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मेडल व सर्टिफिकेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

विविध स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे-वक्तृत्व स्पर्धा-इ.५ वी ते ६ वी गट - त्रिशा शिंदे (प्रथम), जान्हवी दाढे (द्वितीय), सरताज मुलाणी (तृतीय), वीरधवल हेगडे (उत्तेजनार्थ), इ.७ वी ते ८ वी गट - सोनम शिंदे (प्रथम), चैत्राली वाघमारे (द्वितीय), साईप्रिया यादव (तृतीय), सानिक होनमाने (उत्तेजनार्थ). इ.९ वी व १० वी गट-आरती साळुंखे (प्रथम), दिव्या सरवळे (द्वितीय), गौरी हुलगे (तृतीय).

इ.११ वी व १२ वी गटांमध्ये प्रांजली साळुंखे (प्रथम), सोहम फुगे(द्वितीय), सिद्धी कोळेकर (तृतीय).

मेहंदी स्पर्धा-इ.५ वी ते ६ वी गट-गलसनोबर सय्यद (प्रथम), आकांक्षा कोळी (द्वितीय), श्रेया काटे (तृतीय), सृष्टी काळे (उत्तेजनार्थ), इ.७ वी ते ८ वी गट- सीझा मुलाणी (प्रथम), स्नेहल वजाळे (द्वितीय), महेक शेख (तृतीय), सृष्टी काळे (उत्तेजनार्थ), इ.९ वी १० वी गट मुली-अवंतिका बेंद्रे (प्रथम), सानिया शेख (द्वितीय), सानिया बागवान(तृतीय), तृप्ती धुमाळ व मुस्कान शेख (उत्तेजनार्थ),

इ.११ वी १२ वी गट मुली- वैष्णवी आढाव(प्रथम), संस्कृती सुळ (द्वितीय), सृष्टी खरे (तृतीय), ऋतुजा कांबळे (उत्तेजनार्थ), मुले सहभाग-पवन रेणके (प्रथम), सोहम दळवी(द्वितीय).

हस्ताक्षर स्पर्धा-इ.५ वी ६ वी गट- स्वराज सावंत (प्रथम), पृथ्वीराज गोरे (द्वितीय) स्वामिनी थोरात (तृतीय). इ.७ वी व ८ वी गट- पृथ्वीराज सावंत (प्रथम), सोहम लोखंडे (द्वितीय), सिद्धी तुपे (तृतीय), इ.९ वी व १० वी गट- समीक्षा खरात (प्रथम), दिव्या सरतापे (द्वितीय) रचना ओव्हाळ (तृतीय). इ.११ वी व १२ वी गट-तृप्ती इंगळे (प्रथम), आशिकी शेंडगे (द्वितीय), ऋतुजा खाडे (तृतीय). यावेळी विद्यार्थिनींची भाषणे झाली. स्पर्धा पार पाडण्यासाठी शिक्षक व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा नलवडे यांनी केले, बक्षिसाचे वाचन सविता पांढरे यांनी तर आभार आशा रानमाळ यांनी मानले.

# एसव्हीसीएस कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील एस.व्ही.सी. एस. कनिष्ठ महाविद्यालय, भवानी पेठ येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले.प्रारंभी वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य राम ढाले हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ९५ एफएमच्या आरजे श्रध्दा पटेल उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थिनींनी विविध गीतांवर नृत्य, भारुडे, सादर केली. तसेच काही विद्यार्थिनींनी संगीत वाद्य वाजवून आलेल्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी प्राचार्य ढाले यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, यासाठी शिक्षक व पालकांनी प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर कलागुणदेखील जोपासावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य रामेश्वर झाडे यांचे ही मार्गदर्शन लाभले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, पालक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा रोडगीकर व रंजिता होळीकट्टी यांनी केले.शेवटी आभार प्रा. उस्तुरगे यांनी मानले.

# तोडणी वाहतूक बिलाची 30 कोटी रक्कम वाहनमालकांच्या खात्यावर जमा



**पिंपळनेर (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब कारखान्याचे 15 डिसेंबर अखेर ऊस तोडणी वाहतूक बील वाहनमालक यांच्या खात्यावर जमा करण्यात आले असल्याची माहीती संस्थापक अध्यक्ष मा. आ.बबनराव शिंदे यांनी दिली. अधिक माहीती देताना मा.आ.शिंदे म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब येथील सन 2024-25 चा गाळप हंगाम जोमाने सुरू असून युनिट नं.1 येथे प्रतिदिन 13500 ते 14000 मे.टन व युनिट नं.2 येथे प्रतिदिन 4500 ते 5000 मे. टन गाळप होत आहे. युनिट नं.1 येथे आजअखेर 5 लाख 26 हजार 942 मे.टन ऊस गाळप झाले आहे. तसेच युनिट नं.2 येथे आजअखेर 1 लाख 85 हजार 081 मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. दोन्ही युनिटचे मिळून आजअखेर 7 लाख 12 हजार 023 मे.टन ऊसाचे गाळप झालेले आहे.

या गळीत हंगामामध्ये युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब कडे ऊस तोडणी वाहतूकीसाठी असलेल्या वाहनमालकांची दि.15 डिसेंबर अखेरपर्यंतची तोडणी वाहतूक बिले अदा करण्यात आली आहेत. तोडणी वाहतूक बिलापोटी कारखान्याने 30 कोटी 89 लाख अदा केले आहेत. ऊस तोडणी वाहतूक बिलाची रक्कम वाहनमालकांच्या खात्यावर जमा करणेत आली आहे.

# राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी शासन कटीबद्ध - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण राज्याच्या शहरी व ग्रामीण भागात सहकार चळवळ रुजलेली आहे. किंबहुना संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्याला आघाडीवर ठेवण्यात सहकार चळवळीचा मोठा वाटा आहे. त्यामुळे राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

सोलापूर येथे आयोजित सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ व स्मरणिका प्रकाशन प्रसंगी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी भारतीय रिझर्व बँकेच्या मध्यवर्ती मंडळाचे संचालक सतीश मराठे, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, समारंभाचे स्वागत अध्यक्ष राजशेखर शिवदारे, बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, व्हाईस चेअरमन सुचेता थोबडे, बँकेचे सर व्यवस्थापक रामलाल शर्मा, सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा सहकारी बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

सहकार मंत्री पाटील पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचा विकास ग्रामीण भागात रुजलेल्या सहकार चळवळीमुळे मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. देशातील अन्य राज्याचा विचार केला तर त्या राज्यामध्ये सहकार चळवळ व्यवस्थितपणे रुजलेली नाही, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात आवश्यक तेवढा विकास न झाल्यामुळे त्या राज्यातील नागरिक रोजगारासाठी महाराष्ट्र राज्यासह अन्य विकसित राज्यात स्थलांतर करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आपल्या राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना अधिक बळ देण्याचे धोरण शासनाने निश्चित केलेले असल्याचे त्यांनी सांगितले.

सहकारी चळवळीचे महत्त्व जाणून केंद्रीय सहकार विभागाने संपूर्ण देशभरात पुढील पाच वर्षात दहा हजार पेक्षा अधिक सहकारी संस्था स्थापित करण्याचे धोरण ठरवलेले आहे. राज्याचे सहकार विभाग ही सहकारी संस्थांमध्ये नव तंत्रज्ञानाचा वापर करून सहकारी संस्थांच्या उन्नतीला चालना देण्यासाठी सहकार्याची भूमिका निभावणार आहे. सहकारी संस्थांनी आपली विश्वासाहर्ता टिकवण्यासाठी आरबीआय ने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे असून कोणतीही सहकारी संस्था यशस्वी होण्यासाठी प्रामाणिकता, स्वच्छता व शिस्तबद्धता या तीन गुणांचा अंगीकार करावा, असे आवाहनही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सुचित केले.

सोलापूर जिल्ह्यातील 32 नागरी सहकारी बँकापैकी 27 बँकांची परिस्थिती चांगली असून ही बाब सोलापूर जिल्ह्यात सहकार चळवळ व्यवस्थितपणे सुरू असल्याचे पाटील यांनी सांगून सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभास शुभेच्छा देऊन या बँकेसह सर्व सहकारी बँकांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

भारतीय रिझर्व बँकेच्या मध्यवर्ती मंडळाचे संचालक सतीश मराठे यांनी देशभरात जवळपास चौदाशे सहकारी बँका असून त्यातील एक तृतीयांश बँका महाराष्ट्र राज्यात कार्यरत आहेत असे सांगून सहकार चळवळीला भाग भांडवल निर्माण करण्याचा मोठा प्रश्न असल्याचे सांगून सहकार कायद्यात बदल करून बँकांना भांडवल निर्मिती करण्यासाठी शासनाने विचार करावा. टेक्नॉलॉजी फंड निर्माण करून शासनाने सहकारी संस्थांना वित्तीय सहाय्य उपलब्ध करून द्यावे त्याप्रमाणेच कर्ज वसुली प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

आ. सर्वश्री विजयकुमार देशमुख सुभाष देशमुख सचिन कल्याण शेट्टी व देवेंद्र कोठे यांनी आपले मनोगत व्यक्त करून सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी समारंभ निमित्त बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रारंभी समारंभाचे स्वागत अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी बँकेच्या वाटचालीची माहिती दिली तर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी बँकेने 1974 पासून आज रोजी पर्यंत केलेल्या व राबवलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सर्व लोकप्रतिनिधी व मान्यवर यांच्या हस्ते सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली तर बँकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे आभार बँकेच्या संचालक मंडळाकडून मानण्यात आले.